**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर  **P.S.(ठाणे):** जेल रोड
**Year (वर्ष):** 2024
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0537
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/12/2024 02:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Date From (दिनांक पासून):** 05/12/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/12/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Time From (वेळेपासून):** 16:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/12/2024  **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/12/2024 02:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
ईशान्य, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शहर वाहतुक शाखा,उत्तर येथील ट्रफिक डंपयार्ड,सोलापुर शहर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शिवराज शिवकर्ण तेलंग
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2000
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लिंबीचिचोळी,दक्षिण सोलापूर,सोलापूर,जेल रोड,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लिंबीचिचोळी,दक्षिण सोलापूर,सोलापूर,जेल रोड,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-7823005856

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बसप्पा शिवराज साखरे | | | 1. 148,प्रतिक नगर, मुरारजी पेठ,,सोलापूर विलास शिवराज गिराम,सोलापुर शहर,जेल रोड, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 06.12.2024

मी शिवराज शिवकर्ण तेलंग, वय-24 वर्षे, व्यवसाय- कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापुर तोलार, रा. मुं.पो. लिंबीचिचोळी, ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर मो.नं.7823005856 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, मी कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर येथे तोलार म्हणून काम करतो.

मी आज दि. 05/12/2024 रोजी 11.30 वा.चे सुमारास कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर येथून माझे तोलारचे काम संपल्यावर माझे भाऊ नरसय्या यांची बुलेट क्र. एमएच 13 डीएच 1717 वरुन माझे घरी जात असताना, अक्कलकोट रोड पाणि टाकी जवळील एम.एस.ई.बी. येथे दोन ट्रॅफिक पोलीसांनी मला थांबवून बुलेटचा सायलेंसर हा कंपनीचा नाही असे म्हणाले व सदर बुलेटवर यापुर्वीचे रु 3000 दंड पेंडिग असल्याचे सांगून पोलीस साखरे व भोई यांनी बुलेट घेवून साखरे यांनी चालवत मला पाठिमागे बसवून जेलरोड जवळील ट्रॅफिक डंपयार्ड येथे आणुन लावली. त्यांनतर त्यांनी मला सांगितले कि, यापुर्वीचे दंड रु 3000 माफ करतो, आता सायलेंसरचे रु 2000 दे असे बोलून पैशाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पावती मिळेल का दोन हजार रुपयाची असे विचारले असता, त्यांनी पावती नसती त्याची असे सांगितले. त्यानंतर मी तिकडून निघून आलो. सदरबाबत मी माझे वडिलांना फोनवरुन कळविले असता, त्यांनी त्यांचे वकील मित्र रेवणकाका यांना सांगितले. थोडया वेळाने माझे वडिलांनी मला फोनवरुन सांगितले कि, रेवणकाका ट्रफिक ऑफिसला जावून आले आहेत. ते बुलेट सोडतील तू जा. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे जातो असे सांगितले.

माझ्या बुलेटचे सायलेंसर कंपनीचे नसल्याबाबत कारवाई न करण्यासाठी रु. 2000/- मागणी करत असून सदर पैशाची पावती देणार नसल्याचे पोलीस साखरे व भोई यांनी सांगितल्यामुळे ते लाचेची मागणी करत असल्याबाबत माझी खात्री झाली. त्यामुळे मी सदरबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सोलापूर येथे येवून समक्ष तक्रार दिली. पोलीस साखरे व भोई यांच्याशी माझा कोणताही पूर्वीचा आर्थिक व्यवहार व भांडणतंटा नाही, तरी माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे अशी तक्रार कथन केली.

त्यामुळे मी आज अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथे समक्ष हजर राहून लाच मागणीची तक्रार पोनि पिंगुवाले यांना सांगीतली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. पोनि पिंगुवाले यांनी दोन्ही पंचांची व माझी आपसात ओळख करून दिली. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी दोन्ही पंचासमक्ष माझी तक्रार कथन करण्यास सांगितले असता, मी वरीलप्रमाणे माझी तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. सदरची लेखी तक्रार पोनि पिंगुवाले व पंचानी वाचून त्यावर त्यांनी सह्या केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक पिंगुवाले यांनी मला पोलीस साखरे व भोई यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, ते जेलरोड जवळील ट्रॅफिक डंपयार्ड येथे होईल असे मी सांगितले. त्यावेळी पोलीस निरीक्षक पिंगुवाले यांनी सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून अमित गायकावाड व पंच क्र.2 म्हणून तुकाराम सरवदे असे काम करायचे ठरले. तसेच पोलीस साखरे व भोई यांनी पंच क्र. 1 यांच्याबाबत विचारणा केल्यास ते माझे मित्र असल्याचे सांगणे बाबत सूचना दिल्या. त्यानंतर पोलीस पोनि पिंगुवाले साहेब यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे अंगातील नेसते पॅन्टचे समारील उजवे बाजुच्या खिशामध्ये ठेवून मला पोलीस साखरे व भोई यांना भेटायला पंच क्र. 1 यांची मोटार सायकल क्र. एमएच 13 एस 9429 स्प्लेंडर यावरुन 16.19 वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय येथून रवाना केले. मी व पंच क्र. 1 असे जेलरोड जवळील ट्रॅफिक डंपयार्ड येथे गेलो असता, पोलीस साखरे व भोई हे दोघे हजर नव्हते, त्यामुळे मी तेथे हजर असलेल्या पोलीसांना विचारले असता, त्यांनी माझी वाट बघून गेले असे सांगुन मला पोलीस

भोई याचा मोबाईल नंबर दिला, त्यावर मी फोन केला असाता पोलीस भोई यांनी मला सकाळी बुलेट आणलेले साखरे साहेब येतील तु थांब असे सांगितले, थोडया वेळाने साखरे साहेब आले त्यावेळी त्यांनी मला विचारले कुठे गेला होता, मी त्यांना सांगितले नाष्टयाला गेलो होतो. त्यावर त्यानी सांगितले कि, कोण आले होते, कोणाला घेवून आला होता, त्यावर मी त्यांना काका आले होते, रेवणकाका असे सांगितले. त्यानंतर आमच्यात चर्चा झाली चर्च दरम्यान पोलीस साखरे यांनी आम्हाला बोलले की, ठिक आहे सहकार्य करतो म्हणुन, तुझ काय म्हणण असंच सोडुन दयायच का ? असे सांगितले असता मी त्यांना किती असे विचारले असता त्यांनी दोन हजार रुपये दया. असे सांगितले त्यावेळी मी त्यांना दोन नाही असे सांगितले असता, त्यांनी मग किती असे विचारले, त्यावेळी मी त्यांना त्यांनी सागितले म्हण कि काका येवून कोण होते बोलले त्यांना असे बोलून वकील काका यांनी सांगितले बाबत बोललो असता त्यांनी बोलले ते वकील आहेत सहकार्य करतो म्हणून सांगितल त्यांना असे सांगितले, त्यानंतर त्यांनी तुझ म्हणण काय असच सोडाव असे सांगितले, त्यावर मी त्यांना किती साहेब असे विचारले असता सांगितल कि 500 कमी दे दिड हजार रुपये दे असे बोलून माझ्याकडे 1500 रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर त्यानी हे बघ भरु वाटले भर नाहीतर बुलेट गेली, जमा झाली ते पहिल्याचे तिन हजार रुपये भर, सायलेंसर कंपनीच घेवून ये आणि गाडी घेवून जा असे सांगितले. त्यावर मी त्यांना दिड हजार दयायचे काही नाही पावती मिळेल का ? असे विचारले असता त्यांनी पावती काढल्याशिवाय गाडी कशी सुटते तुझ आधारकार्ड लागत अजून असे सांगितले, त्यावर मी त्यांना हा असे सांगितले त्यावर त्यांनी हा मग असे बोलले असता मी त्यांना परत पावती भेटते असे विचारले असता त्यांनी कशाला पावती तुला कशाला पावती मिळते असे बोलले असता मी त्यांना नाही ना असे बोलून पावती मिळत नाही याबाबत खात्री केली. त्यानंतर त्यांनी तुझ आधारकार्ड लागतो जमा करायला असे सांगितले. त्यांनतर आमच्या चर्चा झाली चर्चेदरम्यान पोलीस साखरे यांनी बोल पुढे काय करायचे आहे असे बोलून लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना दहा मिनीटात घेवून येतो असे सं◌ागितले असता त्यांनी माझ्या पोरीचा बड्डे आहे जायचे आहे असे बोलून पैसे लवकर आणण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.01 तिथून परत निघुन अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयात येवून पोलीस निरीक्षक पिंगुवाले यांची भेट घेतली आणि घडलेली हकिकत सांगितली. पोलीस पिंगुवाले साहेब यांनी पंच क्र.01 अमित गायकवाड व मला घडलेली हकिकत विचारुन घेतली त्यानंतर त्यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये मी व पंच नं. 01 यांनी सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले.
सदर पडताळणी कारवाईदरम्यान पोलीस साखरे यांनी 1500 रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस निरीक्षक पिंगुवाले साहेबांनी पोलीस साखरे यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देवुन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली, सदर वेळी मी हजर केलेले 1500/- रू. रकमेच्या नोटांना त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या पाठिमागील बाजुच्या उजव्या खिशात ठेवले. त्यानंतर पोलीस निरीक्षक पिंगुवाले साहेबांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. दिल्यानंतर पोलीस पोनि पिंगुवाले साहेब यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या पॅन्टीच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर मला पोलीस साखरे यांना भेटायला पंच क्र. 1 यांची मोटार सायकल क्र. एमएच 13 एस 9429 स्पेन्लडर यावरुन 17.52 वाजता अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय येथून रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पथक व पंच क्र. 2 यांच्यासह सरकारी वाहनाने आमच्या मागोमाग येवून ट्रॅफिक डंपयार्ड गेटच्या अलिकडे शासकिय वाहन थांबवून ते पायी चालत येवून ट्रफिक डंपयार्डचे गेटजवळ बाहेरील बाजूस कोणास संशय येणार नाही असे थांबले, त्यांनतर मी व पंच क्र. 1 असे ट्रॅफिक डंपयार्डच्या आतमध्ये जावून साखरे यांची भेट घेतली असता, पोलीस साखरे यांनी मला आधारकार्ड आणले का असे विचारुन हाताच्या इशा-याने पैशाबाबत विचारणा केली त्यावेळी मी त्यांना हो आणले असे सांगितले असता त्यांनी इशा-याने लाचेची मागणी केली असता मी पॅन्टच्या पाठिमागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढून समोर धरली असता साखरे यांनी ती डावे हाताने स्वीकारुन त्यांचे अंगातील नेसते ट्रॅक पॅन्टच्या समोरील डावे बाजूचे खिशात ठेवली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझे मो.क्र. 7823005856 वरुन पोनि पिंगुवाले यांचे मो.क्र. 9067891014 वर मिस्ड कॉल करुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा दिला. त्यावेळी गेटजवळ थांबलेले पोनि पिंगुवाले व सापळा पथक आत येवून पोनि पिंगुवाले यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारलेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना माझ्या समोर उभे असलेले पोलीस साखरे यांच्याकडे हाताने इशारा करुन ते पोलीस साखरे असून त्यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत सांगितले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझे अंगातील नेसते पॅन्टचे समोरील उजवे बाजुच्या खिशामधून व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला व पोलीस साखरे यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बसप्पा शिवराज साखरे वय-34 वर्षे, पद- पोलीस कॉन्स्टेबल ब.नं. 555, नेम- शहर वाहतुक

शाखा, उत्तर, आयुक्तालय सोलापूर राहणार- 148, प्रतिक नगर, मुरारजी पेठ, सोलापूर विलास शिवराज गिराम यांचे घरी भाडेतत्वावर असे सांगितले. त्यानंतर पोलीस साखरे यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत करुन सदर ठिकाणी लोकांची गर्दी असल्याने सरकारी वाहनात सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर पोलीस साखरे यांना ताब्यात घेवून सापळा कारवाईबाबत श्री सुधिर खिरडकर सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक शाखा, सोलापूर शहर यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले.

तरी दि. 05/12/2024 रोजी 16.19 ते 18.02 वा चे दरम्यान लोकसेवक बसप्पा शिवराज साखरे वय-34 वर्षे, पद- पोलीस कॉन्स्टेबल ब.नं. 555, नेम- शहर वाहतुक शाखा, उत्तर, आयुक्तालय सोलापूर राहणार- 148, प्रतिक नगर, मुरारजी पेठ, सोलापूर विलास शिवराज गिराम यांचे घरी भाडेतत्वावर यांनी शहर वाहतुक शाखा, उत्तर येथील ट्रॅफिक डंपयार्ड येथे बुलेट क्र. एमएच 13 डीएच 1717 या मोटार सायकलचे सायलेंसर कंपनीचे नसल्याबाबत सांगुन त्यावर कारवाई न करण्यासाठी स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन 2,000/- रू लाच मागणी करून तडजोडीअंती रु.1500/- स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SURESH SUDHAKARRAO CHATE(I (Inspector)) / pobn72849 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Telangss

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
जेलरोड पो.स्टे.,सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SURESH SUDHAKAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pobn72849